# बृहन्मुंबई महानगरपालिका

## नियोजन विभाग

सहाय्यक आयुक्त (नियोजन) यांचे कार्यालय, ५ वा मजला, जनता क्लॉथ मार्केट इमारत, हॉकर्स प्लाझा, सेनापती बापट मार्ग, दादर (प), मुंबई - ४०००२८

विषय – **स्वारस्याच्या अभिव्यक्तीद्वारे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जागांमध्ये शहरातील बेघर / निराधार, रस्त्यावर राहणाऱ्या नागरिकांना पावसाळ्यात आश्रयासाठी ४ महिने १ जून ते ३० सप्टेंबर या कालावधीसाठी निवा-यांचे प्रचलन व व्यवस्थापन करण्यासाठी संस्था, वस्तीस्तर संघ (ALF), शहर स्तर संघ (CLF) यांच्याकडून अर्ज मागविण्याबाबत**

शहरातील बेघर / निराधार, रस्त्यावर राहणाऱ्या नागरिकांना पावसाळ्यात राहण्याच्या समस्याला सामोरे जावे लागते .पावसाळा ही एक शहरातील बेघर / निराधार, रस्त्यावर राहणाऱ्या लोकांसाठी आपत्ति असल्याने सदर नागरिकांसाठी अश्या प्रकारच्या निवारा केंद्राची पावसाळ्यात गरज आहे. बृहन्मुंबई महानगरपालिका – आपत्ति व्यवस्थापन विभागामार्फत आपत्ती कालावधीत चालविण्यात येणाऱ्या निवाराकेंद्रापैकी एक निवारा पावसाळी १ जून ते ३० सप्टेंबर कालावधी पर्यत बेघर/ रस्त्यावर राहणाऱ्या लोकांसाठी सुरु करणेबाबत निवारा उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने स्वयंसेवी संस्था, वस्तीस्तर संघ (ALF), शहर स्तर संघ (CLF) यांच्याकडून ४ महिने कालावधीसाठी निवा-यांच्या प्रचलन व व्यवस्थापनासाठी अर्ज मागविण्यात येत आहे.

सदर निवा-यांच्या ठिकाणी महानगरपालिकेकडून पाणी, वीज, पुरविण्यात येईल. निवा-यात वास्तव्य करणा-या बेघरांना अंथरुण, पांघरुण इत्यादि सुविधा संस्थेने उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. स्वारस्याच्या अभिव्यक्तीचा विस्तृत नमूना व त्यासंबंधीची माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या वेबसाईटवर महानगरपालिका विषयी – विभाग- खात्यांची मार्गदर्शिका – सहा.आयुक्त (नियोजन) कागदपत्र येथे दि. १६.०७.२०२२ ते २२.०७.२०२२ या कालावधीसाठी पाहवयास उपलब्ध आहे.

स्वारस्याच्या अभिव्यक्तीचे प्रस्ताव विहित नमुन्यात सादर करणे आवश्यक आहे. स्वारस्याच्या अभिव्यक्तीचे प्रस्ताव कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार मा. आयुक्त बृहन्मुंबईमहानगरपालिका यांनी राखून ठेवला आहे.

सही/-

सहाय्यक आयुक्त (नियोजन)

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या

**स्वारस्याच्या अभिव्यक्तीद्वारे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जागांमध्ये शहरातील बेघर / निराधार, रस्त्यावर राहणाऱ्या नागरिकांना पावसाळ्यात आश्रयासाठी ४ महिने १ जून ते ३० सप्टेंबर या कालावधीसाठी निवा-यांचे प्रचलन व व्यवस्थापन करण्यासाठी संस्था, वस्तीस्तर संघ (ALF), शहर स्तर संघ (CLF) यांच्याकडून अर्ज मागविण्याबाबत**

शहरातील बेघर / निराधार, रस्त्यावर राहणाऱ्या नागरिकांना पावसाळ्यात राहण्याच्या समस्याला सामोरे जावे लागते. पावसाळा ही एक शहरातील बेघर / निराधार , रस्त्यावर राहणाऱ्या लोकांसाठी आपत्ति असल्याने सदर नागरिकांसाठी निवारा केंद्राची पावसाळ्यात गरज असल्याने बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात म.न.पा.च्या २४ विभाग कार्यक्षेत्रातील उपलब्ध असलेल्या जागांमध्ये **पावसाळ्यात आश्रयासाठी बेघर निवारे ४ महिने (१ जून ते ३० सप्टेंबर) या कालावधीसाठीच्या निवारा केंद्राचे** प्रचलन व व्यवस्थापनासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात काम करणा-या अशासकीय सामाजिक संस्था, वस्तीस्तर संघ (ALF), शहर स्तर संघ (CLF) यांच्याकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर संस्थांनी निवा-यांचे प्रचलन व व्यवस्थापन करण्यासाठी आवश्यक तो प्रशिक्षित कर्मचारी वर्ग सुरक्षाव्यवस्थेसह उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

**पात्रता व सादर करावयाची कागदपत्रे –**

1. बेघरांसाठी निवारे चालविण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक न्यास नोंदणी अधिनियम १९५० / अशासकीय संस्था / सामाजिक संस्था धर्मादाय आयुक्तांकडे संस्था नोंदणी अधिनियमअंतर्गत नोंदणीकृत असावी.
2. संस्था [www.ngodarpan.gov.in](http://www.ngodarpan.gov.in) या पोर्टलवर नोंदणीकृत असावी. सदर संस्थेचा रजिस्ट्रेशन आयडी असणे आवश्यक आहे.
3. निवा-यांचे प्रचलन व व्यवस्थापन करणा-या संस्थांची वार्षिक उलाढाल रु. ५ लाखांपर्यंत असणे आवश्यक आहे.प्रस्तावासोबत पासबुकची छायांकित प्रत जोडण्यात यावी.
4. संस्थेने मागील 3 वर्षाचे लेखापरिक्षण अहवाल जोडणे आवश्यक आहे.
5. मागील 3 वर्षाचे आयकर परतावा संबंधिची कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.
6. स्वयंसेवी संस्थेचे कार्यक्षेत्र बृहन्मुंबई महापालिका क्षेत्रात असणे आवश्यक आहे.
7. शासनाने/ न्यायालयाने सदर संस्थेला काळया यादीत समाविष्ट केले नसल्याचे प्रतिज्ञापत्र जोडण्यात यावे.
8. संस्थेला वसतीगृह, भिक्षेकरीगृह, (बेगर होम) रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी निवास व्यवस्था करण्याचा तसेच सामाजिक कार्याचा अनुभव असलेल्या संस्था / अशासकीय संस्था / सामाजिक संस्था / वस्तीस्तर संघ (ALF) / शहर स्तर संघ (CLF) यांनी सदरचे काम केल्याचा तपशिल प्रस्तावासोबत जोडण्यात यावा.

# <u>निवारे चालविण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे:</u>

## अ) पावसाळी ऋतू मध्ये शहरी बेघरांसाठी निवा-याची संकल्पना -

| | |
|---|---|
| १ | शहरातील बेघर / निराधार , रस्त्यावर राहणाऱ्या नागरिकांना पावसाळ्यात राहण्याच्या समस्याला सामोरे जावे लागते. पावसाळा ही एक शहरातील बेघर / निराधार , रस्त्यावर राहणाऱ्या लोकांसाठी आपत्ति असल्याने सदर नागरिकांसाठी अश्या प्रकारच्या निवारा केंद्राची पावसाळ्यात गरज आहे. शहरात सुरु करण्यात आलेल्या प्रत्येक निवा-यामध्ये दोन स्वतंत्र भाग असावेत, एक भाग पुरुषांसाठी व दुसरा भाग महिला व 14 वर्षाखालील मुलांसाठी असावा. परंतु जागेअभावी मुंबई शहरात पुरुषांसाठी फक्त / महिलांसाठी व त्यांच्यासोबत असलेल्या 14 वर्षाखालील मुलांसाठी फक्त असे निवारे चालविण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुसार सदर निवारे हे तात्पुरत्या स्वरुपाचे ४ महिने (१ जून ते ३० सप्टेंबर ) या कालावधीसाठी असतील. |

## ब) निवा-यांमध्ये उपलब्ध करुन द्यावयाच्या सुविधा -

| प्रत्येक निवा-यांमध्ये खालील सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. | |
|---|---|
| अ) | निवा-यांची क्षमता कमीत कमी २०० व्यक्तींची असणार आहे |
| ब) | महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र प्रसाधनगृह |
| क) | स्वयंपाक गृह |
| ड) | महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र झोपण्याची व्यवस्था |
| इ) | आरोग्य सुविधा |
| ई) | कोरोना संबधित चाचणी |

## ऐच्छिक सुविधा

| | |
|---|---|
| 1 | प्रत्येक निवा-यामध्ये स्वयंपाकगृह असावे, जेथे चहा/कॉफी, नास्ता, जेवण, इ. सोयी उपभोक्त्यांना वाजवी दर आकारुन देण्याची व्यवस्था असावी, जेणेकरुन तेथे राहणा-यांना या गरजा भागविण्यासाठी बाहेर जाण्याची आवश्यकता भासणार नाही. निवा-यांमध्ये राहणा-यांसाठी जेवण व्यवस्था ना नफा - ना तोटा तत्वावर असावी. अथवा परिस्थितीजन्य मोफत देण्यात येईल. |

## क)निवा-यांची कार्यपध्दती –

निवारे चालवितांना खालील कार्यपध्दतीचे कटाक्षाने अवलंबन करण्यात येईल असे महानगरपालिकेने सुनिश्चित करावे.

| | |
|---|---|
| १ | निवा-यामध्ये प्रविष्ठ झालेल्या प्रत्येक व्यक्तीच्या, मग तो स्वत: आलेला असो अथवा पोलीसांनी किंवा अन्य सक्षम प्राधिका-यांनी आणलेला असो, नाव, पत्ता, वय, धंदा इत्यादीची नोंद तेथे या प्रयोजनार्थ ठेवण्यात आलेल्या नोंदवहीमध्ये त्या ठिकाणी कर्तव्यस्थ कर्मचा-याने करुन घ्यावी. |
| २ | नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्याला / तिला झोपण्यासाठी अंथरुण /पांघरुणाची व्यवस्था उपलब्ध करुन द्यावी. तसेच तेथे मोफत उपलब्ध असलेल्या सुविधांची माहिती देण्यात यावी. |
| ३ | निवा-यांमध्ये येणा-या प्रत्येक व्यक्तीची येण्या-जाण्याच्या वेळेची न चुकता संबंधीत नोंदवहीत नोंद करण्यात यावी. निवा-यात प्रवेश देण्यात आलेली कोणतीही व्यक्ती बाहेर जाण्यासाठीची नोंदणी प्रक्रिया पूर्ण करुन घेतल्याशिवाय निवारा सोडणार नाही. हे सुनिश्चित करण्यात यावे. |
| ४ | सर्व प्रकारच्या मादक द्रव्यांच्या / पदार्थाच्या सेवनास निवा-यांमध्ये सक्त प्रतिबंध करण्यात यावा. |
| ५ | निवा-याचा परिसर पूर्णपणे धुम्रपान निषिध्द व तंबाखु मुक्त असावा. |

## ड) निवा-यांतील आरोग्य व्यवस्था –

प्रथम उपचार पेटीव्यतिरिक्त निवा-यामध्ये राहणा-या व्यक्तींना वैद्यकीय सुविधा पुरविण्यासाठी व आवश्यकतेनुसार सार्वजनिक रुग्णालयांकडे संदर्भ सेवेकरिता पाठविण्यासाठी निवा-यास महानगरपालिकेच्या वैद्यकीय अधिका-यांनी भेट देण्याची व्यवस्था महानगरपालिका करेल.

## ई) निवा-यांमधील निवासी लोकांना सल्ला व मार्गदर्शन करण्याची व्यवस्था–

निवा-याचे संचलन करणा-या अशासकीय संस्थेमार्फत तेथे निवासीसाठी येणा-या लोकांच्या आर्थिक - सामाजिक परिस्थितीची माहिती विहित नमुन्यात संकलीत करण्यात यावी. त्यामध्ये अशा व्यक्तीचे शिक्षण, अवगत कौशल्य, आर्थिक - सामाजिक पार्श्वभूमी, उपजिविकेचे साधन इत्यादि माहितीचा समावेश असावा,जेणेकरुन शासनाद्वारे किंवा महानगरपालिकेद्वारे राबविण्यात येणा-या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी ते पात्र आहेत किंवा कसे याचे आकलन करणे शक्य होऊ शकेल. संबंधित व शासकीय संस्थेने निवा-यामध्ये आलेल्या व्यक्तींबाबत त्यांच्या सामाजिक - आर्थिक तपशिलांसबंधी विहित नमून्यातील माहिती महानगरपालिकेस पाठवावी व त्याआधारे महानगरपालिकेने त्यांच्या संबंधित अधिका-यांमार्फत संबंधित व्यक्तींना मार्गदर्शन करावे आणि महानगरपालिका व शासनाद्वारे राबविण्यात येत असलेल्या कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्याबाबत त्यांना प्रोत्साहीत करेल.

## उ) निवा-याचे संचलन व देखभाल -

| | |
|---|---|
| १ | निवारे चालविण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक न्यास नोंदणी अधिनियम १९५० /अशासकीय संस्था /वस्ती स्तर संघ / शहर स्तर संघ / सामाजिक संस्थांची निवड करताना वसतीगृह, भिक्षेकरीगृह (बेगर होम) / रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी निवास व्यवस्था करण्याचा अनुभव असणा-या संस्थांना प्राधान्य देण्यात येईल. |
| २ | निवारे चालविण्याची जबाबदारी अशा वरील संस्थांना **४ महिने (१ जून ते ३० सप्टेंबर)** कालावधीसाठी देण्यात येईल. |

## ऊ) संस्था निवडीचे निकष

| | | |
|---|---|---|
| १ | | महाराष्ट्र सार्वजनिक न्यास नोंदणी अधिनियम १९५० /अशासकीय संस्था/ सामाजिक संस्था / वस्ती स्तर संघ /शहर स्तर संघ धर्मादाय आयुक्तांकडे रजिस्टर असावी. |
| | अ) | सामाजिक कार्याचा कमीत कमी तीन वर्षांचा अनुभव असावा प्राधान्याने निवारे चालविणे |
| | ब) | बचत गट चालविणे |
| | क) | वैद्यकीय / इतर सामाजिक उपक्रम राबविणे अशा प्रकारे काम करणा-या संस्थांना प्राधान्य देण्यात येईल. |
| २ | | निवा-यांचे प्रचलन व व्यवस्थापन करणा-या संस्थांची वार्षिक उलाढाल रु. 5 लाखांपर्यंत असणे आवश्यक आहे. |
| ३ | | संस्थेने निवारे चालविण्यासाठी काय काय जबाबदा-या पार पाडणार याबाबतची कार्यप्रणाली सोबत जोडण्यात यावी. |

## ए) निवड प्रक्रीया

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जागांमध्ये शहरातील बेघर / निराधार, रस्त्यावर राहणा-या नागरिकांना पावसाळयात निवाराकेंद्रासाठी प्राप्त झालेल्या संस्था यांची निवड, निवड समितीद्वारे करण्यात येईल. निवड समिती खालीलप्रमाणे आहे.

१. मा. उप आयुक्त (म.ख.खा.) – अध्यक्ष
२. सहाय्यक आयुक्त (नियोजन) – सदस्य
३. प्रमुख लेखापाल ( वित्त) – सदस्य
४. विधी अधिकारी – सदस्य
५. मुख्य समाज विकास अधिकारी (नियोजन) – सदस्य

# मूल्यमापन निकष

| अ.क्र | निकष | मूल्यमापनाची पद्धत | गुण |
|---|---|---|---|
| १ | संस्थेचे स्थापना वर्ष (प्रमाणपत्रानुसार) | १) ३ ते ५ वर्ष<br>२) ५ वर्षापुढे प्रतिवर्ष १ गुण , जास्तीत जास्त १० गुण | ०५ गुण<br>१० गुण |
| २ | अनुभव (वार्षिक अहवालानुसार) | १) १ ते ३ वर्ष (सामाजिक क्षेत्रातील कामाचा अनुभव)<br>२) १ ते ३ वर्ष (सामाजिक क्षेत्रातील कामाचा अनुभवाबरोबर वसतीगृह, भिक्षेकरी गृह,रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांसाठी निवास व्यवस्था करण्याचा अनुभव)<br>३ वर्षापुढे प्रतिवर्ष २ गुण , कमाल गुण ३० गुण | २० गुण<br>३० गुण |
| ३ | संस्थेचे कार्यक्षेत्र | १) विभाग क्षेत्रात काम असल्यास<br>२) परिमंडळ क्षेत्रात काम असल्यास<br>३) त्यापलीकडे मुंबई शहर,उपनगरे क्षेत्रात काम असल्यास | १५ गुण<br>१० गुण<br>०५ गुण |
| ४ | संस्थेचे निपुणता | १) संस्था चालवत असलेल्या उपक्रमाचे लाभार्थी (३ वर्षातील आकडेवारी ) | १० गुण |
| | | २) प्रमाणपत्रे /परितोषिके | १० गुण |
| | | ३ )प्रशिक्षित कर्मचारी | १० गुण |
| ५ | आर्थिक क्षमता ( लेखापरीक्षकाने प्रमाणित केलेले ) (३ वर्षाच्या लेखा अहवालानुसार) | १) ५ ते १० लाख<br>२) १० ते १५ लाख<br>३) १५ लाखापेक्षा जास्त | ०५ गुण<br>१० गुण<br>१५ गुण |

**स्वयंसेवी संस्थेने भरावयाची माहिती**

| अ.क्र. | तपशिल | पृ.क्र. |
|---|---|---|
| 1 | स्वयंसेवी संस्थेचे नाव | |
| 2 | संस्थेचा कार्यालयीन पत्ता व दूरध्वनी क्रमांक | |
| 3 | नोंदणी क्रमांक | |
| 4 | संस्थेचा मेल आयडी | |
| 5 | संपर्कासाठी व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक | |
| 6 | संस्थेने मागील तीन वर्षाचे लेखा परिक्षण अहवाल जोडले असल्याचा तपशिल | |
| 7 | बॅकेच्या पासबुकाची छायांकित प्रत | |
| 8 | संस्थेला काळया यादीत टाकले नसल्याचे प्रमाणपत्र | |
| 9 | संस्थेकडे असलेल्या कर्मचारी वर्गाची माहिती | |
| 10 | संस्थेने मागील तीन वर्षाचे आयकर परतावाची कागदपत्र | |
| 11 | यापूर्वी केलेल्या कामाबाबतचे प्रमाणपत्र | |
| 12 | संस्था राबवित असलेल्या उपक्रमांचा तपशिल | |
| 13 | महानगरपालिका वेंडर क्रमांक | |
| 14 | इतर माहिती | |

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

विषय – बृहन्मुंबई महानगरपालिका – आपत्ति व्यवस्थापन विभागामार्फत आपत्ती कालावधीत चालविण्यात येणा-या निवाराकेंद्रापैकी एक निवारा ४ महिने १ जून ते ३० सप्टेंबर पर्यंत पावसाळी बेघर / रस्त्यावर राहणा-या लोकांसाठी सुरु करणेबाबत.

| अनु क्र. | विभाग | जागेचा पत्ता |
|---|---|---|
| १ | ए | जनरल जगन्नाथ भोसले मार्ग, नरिमन पॉईंट, फायर स्टेशन जवळील पदपथावर (बांधकाम पूर्ण झाल्यानंतर सदर जागा संस्थेच्या ताब्यात देण्यात येईल) |
| २ | सी | दर्शन हाईट इमारत झावबावाडी रोड ठाकूर व्दार, मुंबई |
| ३ | डी | महालक्ष्मी महानगरपालिका शाळा, भूलभाई देसाई मार्ग, मुंबई |
| ४ | ई | क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मनपा मराठी शाळा, भायखळा (प) |
| ५ | एफ दक्षिण | माझे माहेर , आंबेडकर नगर, अभ्युदय नगर, काळाचौकी |
| ६ | एफ उत्तर | प्रभाग क्र.१७९ न.भू..क्र.१ बी/१४१, माटुंगा विभाग वाचनालय एफ/उत्तर, मुंबई |
| ७ | जी दक्षिण | कस्तुरबा गांधी नगर शाळा इमारत |
| ८ | जी उत्तर | गोखले रोड, मुन शाळा बिल्डींग, गोखले रोड, पोर्तुगीज चर्च जवळ, दादर (पश्चिम) |
| ९ | जी उत्तर | भवानी शंकर बिल्डिंग, म्युनिसिपल शाळा,भवानी शंकर रोड, वर्तक हॉल जवळ, दादर (पश्चिम) |
| १० | जी उत्तर | दादर वुलेन मिल, मुन. शाळा बिल्डिंग, जे.के सावंत मार्ग, यशवंतराव चव्हाण नाटयगृह, माटुंगा (पश्चिम) |
| ११ | जी उत्तर | सिटी ऑफ लॉस ॲन्जल्स मुन.शाळा, मनमला टॅक जवळ, जे.के.सावंत मार्ग, माटुंगा (पश्चिम) |
| १२ | जी उत्तर | आर.सी.माहिम उर्दू मुन. शाळा बिल्डिंग, माहिम दर्गा जवळ, माहिम हेल्थ पोस्ट, माहिम (पश्चिम) |
| १३ | जी उत्तर | संत काकय्या बी.एम.सी शाळा बिल्डिंग, ९० फिट रोड, शिवराज मैदान जवळ, धारावी |
| १४ | एच पूर्व | भारत नगर मनपा उर्दू शाळा क्र.१ |
| १५ | एच पश्चिम | परेरा वाडी म्युनिसिपल शाळा २९ वा रस्ता, बांद्रा (प.) |
| १६ | के पूर्व | प्रभाग क्र.८१ मधील प्लॉट क्र.६७ एफ, रोड नं.११ एम आय डी सी अंधेरी पूर्व |
| १७ | एम पश्चिम | एव्हर स्माईल लेआऊट येथील पीएपी इमारत क्र.४४ माहूल गाव |
| १८ | पी दक्षिण | म.न.पा वेल्फेअर सेंटर, नंदादीप हायस्कूलसमोर, जयप्रकाश नगर, गोरेगाव (पू) |
| १९ | आर दक्षिण | सीटीएस क्रमांक ७११/ए/,१ ला मजला, आर एन ए टॉवर समोर, एम.जी.रोड, व्हिलेज कांदिवली प. |
| २० | एस | टेंभीपाडा म्युनिसपल शाळा, सर्वेश्वर हॉस्पिटल जवळ, टेंभीपाडा रोड, भांडूप (पश्चिम) |
| २१ | एस | पासपोली म्युनसिपल शाळा नं.-१, पवई गार्डन जवळ, साकी विहार रोड, पवई |
| २२ | एस | ट्राझ म्युनिसि□पल शाळा, आय.आय.टी मेन गेट, ट्रान्झ, पवई |
| २३ | एस | कन्नमवार नगर, म्युनिसिपल शाळा, कन्नमवार नगर नं.१, रोड नं.२, विक्रोळी पूर्व |

| | | |
|---|---|---|
| २४ | एस | टागोरे नगर, म्युनिसिपल शाळा, जुने पोस्ट ऑफिस जवळ, टागोरे नगर, विक्रोळी पूर्व |
| २५ | एस | भांडूप व्हिलेज, म्युनिसिपल शाळा, भांडूप पश्चिम |
| २६ | एस | एम.व्हि.आर.शिंदे शाळा, ईश्वर नगर, भांडूप पश्चिम |
| २७ | आर/उत्तर | सी तळ मजला ६७९.नं .एस.टी., समाज मंदिर बिल्डिंग तरे मार्गे दहिसर पश्चिम |
| २८ | आर/मध्य | सी मागाठाणे व्हिलेज २/ए/६८.नं.एस.टी., बोरीवली पूर्व |